ठेवले पाहिजे, कळलावीचा वेल तुटायला नको कारण वेल फारच नाजूक असतो, जर तुटला तर पुढच्या वर्षी निघणार नाही.

## रोग व नियंत्रण -

कळलावी स्वतः एक उपविष असल्यामुळे कोणत्याही प्रकारचे किटनाशकांची गरज पडत नाहीं, कधी-कधी काही कीड व रोग जसे- लिली ग्रीन केटरपिलर, लीफ ब्लाइट व राइजोमराट चा प्रादुर्भाव होतो. याच्या नियंत्रणासाठी एक दोन वेळा उपयुक्त बुरशीनाशकाची फवारणीवेळ प्रसंगी सल्ला करून केली पाहिजे.

## दोहन व संग्रहण -

कळलावीच्या वेलांवर फुलं ऑगस्ट-सप्टेंबर महिन्यात व फळं ऑक्टोम्बर-नोव्हेंबर महिन्या पर्यंत येतात. यांचे पीक जवळ-जवळ १७०-१८० दिवसात तयार होतात. डिसेंबर महिन्यात पिकलेले फळं जे हल्के हिरवे पिवळे रंगाचे असतात, त्यांना तोडुन सावलीच्या ठिकाणी १०-१५ दिवसापर्यंत वाळविले पाहिजे. फळांतुन बिया वेगळे करून चांगल्या तऱ्हेने वाळविले पाहिजे. सालं व बिया दोन्ही उपयोगी असतात. त्यानंतर वेगळे-वेगळया पोत्यामध्ये किंवा पॉलिथिनच्या बॅगेत संग्रहण करून ठेवले पाहिजे.

५-६ वर्षाच्या पीकानंतर कंदाना उखडुन धुवून लहान-लहान तुकडे करून चांगल्या तऱ्हेने वाळवले पाहिजे. कारण हयांना वाळवायला जवळ-जवळ दोन महिने लागतात.

## उत्पादन व उत्पन्न -

कळलावीच्या चांगल्या पीकांपासुन प्रति एकर २५०-३०० कि.ग्रा. मिळते. बरोबरच पाचव्या वर्षानंतर २.५ - ३.०० टन वाळविलेले कंद पण प्राप्त होते.

## बाजार भाव -

कळलावी च्या बियां व वाळलेल्या कंदाचे बाजार भाव जवळ-जवळ ४००-५०० रूपये व ५०-१०० रूपये प्रति कि.ग्रा. असते.

## अनुमानित उत्पन्न - खर्च प्रति एकर -

कळलावी च्या शेतीपासुन ५ वर्षा पर्यंत होणारे निव्वळ नफा जवळ-जवळ २.५ - ३.०० लाख रूपये पर्यंत होतो. दुसऱ्या वर्षापासुन शेतकरी बियांणा विकुन प्रत्येक वर्षी फायदा पण मिळवतो.


संकलन व संपादन
डॉ. ए. के. पाण्डे
अनुवाद
संजय पौनीकर व डा. नितिन कुलकर्णी
वन कीट प्रभाग, उ.व.अ.सं., जबलपुर
अधिक जानकारी के लिये संपके करें
निदेशक
उष्णकटिबंधीय वन अनुसंधान संस्थान
पो.आ. - आर.एफ.आर.सी., मण्डला रोड, जबलपुर - 482021
फोन : 0761-2840483, 4044002
वन विस्तार प्रभाग
उष्णकटिबंधीय वन अनुसंधान संस्थान
पो.आ. - आर.एफ.आर.सी., मण्डला रोड, जबलपुर - 482021
फोन : 0761-2840627


Amrit Offset # 2413943



# कळलावी

*(Gloriosa superba)*


उष्णकटिबंधीय वन अनुसंधान संस्थान
(भारतीय वानिकी अनुसंधान एवं शिक्षा परिषद)
डाकघर - आर.एफ.आर.सी., मण्डला रोड,
जबलपुर - 482 021 (म.प्र.)

## ओळख -

कळलावी ही एक बहुवर्षीय लतावेल आहे. ही लिलियेसी कुळातील सदस्य आहे. याचे वनस्पति शास्त्रीय नाव *ग्लोरियोसा सपुरबा* आहे. अतिशय अविवेकपूर्ण दोहनामुळे ही प्रजाति अत्यंत दुर्मिळ पादप श्रृंखला मध्ये समाविष्ट केली गेलेली आहे. ही एक अतिशय महत्वपूर्ण औषधी लतावेल आहे. कंद पातळ, लांब व जमीनीचा खालचा बाजूने कंदवत मांसल हलाचा आकाराचा असतो.

## वनस्पतीचे विवरण -

कळलावी ही एक लतावेल आहे. ही पावसाळ्यात निघते. याचे पान वृतरहित, लटवाकार, भालाकार, बांबू किंवा अदरकच्या पानाच्या आकराचे, जवळ-जवळ ६-८ इंच लांब व १.५ इंच जाड व टोकावर सुत्रवार घुमावदार असतात. फळं २ इंच पर्यंत लांब, ३ लांब पट्टयायुक्त असते. पावसाळ्यात फुलं व फळं येतात. याचे फुलं लाल गुच्छेदार मनमोहक असतात.

## भौगोलिक वितरण -

कळलावी समस्त भारता मध्ये ६००० फुटापर्यंतच्या पर्वत श्रृखंले वर नैसर्गिक रूपात आढळते. या व्यतिरिक्त श्रीलंका, बमा, मलाया, चीन व अफ्रीका मधे पण सहजपणे आढळते. ही औषधी वनस्पती मध्यप्रदेश, महाराष्ट्र, छत्तीसगढ व ओरिसा चा जंगलामध्ये पण आढळते.

## औषधी उपयोग -

कळलावी कण्ठमाल, संधीवात व वात वेदना, कुष्ट टॉनिकच्या रूपात तथा गर्भपात मधे उपयोगी येते. हा एक उप-विष आहे, अल्प प्रमाणात दिल्यावर दिपन, कटु पौष्टिक, ज्वर रोधी व जास्त प्रमाणात दिल्यावर गर्भनिस्सारक चा रूपात कार्य करतो.

## सक्रिय घटक -

कळलावीचे कंद, फळ व बियां मध्ये कोल्चीसीन व ग्लोरियोसीन क्षाराभद्रव (अल्केलाइड्स) तथा सुगंधित तेल, बेन्जोईक अम्ल व शर्करा इत्यादि आढळतात.

## जमीन व हवामान -

कळलावीच्या लागवणीसाठी बलुई, दमट माती ज्यामध्ये पाणी निचराची उत्तम व्यवस्था व सामू (पी.एच.) ६-७ पर्यत असणे सर्वात्तम असते. पाणी न थांबण्याऱ्या कोणत्याही प्रकारच्या जमीनीत याची सहजपणे उगवण केली जाऊ शकते.

## कृषि तंत्रज्ञान -

शेतीची तयारी - लागवणीसाठी निवडलेल्या शेतात ग्रीष्म ऋतुमध्ये दोन-तीन वेळा खोलवर वखरणी करून ८-१० टन कम्पोस्ट किंवा कुजलेली शेणखत मिसळुन द्यायला पाहिजे. त्यानंतर जवळ-जवळ ५०-५० से.मी. च्या अंतराने नाली बनवून शेत तयार करायला पाहिजे.

## प्रवर्धन -

कळलावीच्या प्रवर्धन बिया व कंदा पासुन केला जातो. प्रवर्धनासाठी कंदाच्या वजन ५० ते ६० ग्रॉमा पर्यत असले पाहिजे.

## पेरणी -

कळलावीच्या रोपांना रोपवाटिके मध्ये बियां द्वारे तयार करून रोपण केल्या जाऊ शकते, परंतु असे करण्या अगोदर पहिल्या वर्षी केवळ कंदच तयार होते तथा ह्यावर फुलं व बियां येत नाही. जर याची पेरणी वजनच्या कंदान पासून केली तर जवळ-जवळ ५० ते ६० ग्रॅमापर्यत पहिल्या वर्षातच फळं व बियां प्राप्त होतात. जर बियांपासुनच पीकतात तयार करायचे असेल तर पावसाळा येण्या अगोदरच रोपवाटिका मधे ४-६ इंचाच्या अंतरावर पेरणी करून घ्यायला पाहिजे. दुसऱ्या वर्षी ह्या कंदाना खोदुन ०.१ टक्के बुरशीनाशक द्रावणामध्ये उपाचारित करून पावसाळ्यात मेंढयावर ५० से.मी. ओळी ते ओळी मधे व ४५ से.मी. कंद ते कंद चे अंतर ठेवुन ६-९ इंच खोलावर लावुन दिले पाहिजे. या प्रकारे जवळ-जवळ ८-९ क्विंटल प्रति एकर कंदाची आवश्यकता होते. ही एक आरोही लतावेल आहे, म्हणून ह्याच्या आरोहणासाठी (मांडवासाठी) झाडीचे व वृक्षाचे वाळवेली किंवा फांद्याला प्रत्येक कंदच्या बाजुला गाड्डन ठेवुन द्यायला पाहिजे.

## सिंचन -

पावसाळ्यात सिंचनाची गरज भासत नाही. परंतु पावसाळ्यानंतर गरजेनुसार सिंचन करत राहिले पाहिजे.

## निंदण-खुरपणी -

जमीनीच्या आवश्यकतेनुसार दोन-तीन वेळा निंदणी - खुरपणी करून तण-गवत काढून टाकायला पाहिजे. निंदणी करते वेळी हे लक्षात